महाराष्ट्र शासन

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगावं जि.जळगांव

यांचे कार्यालय कृषि उत्पन्न बाजार समिती, धरणगांव आवार    दुरध्वनी क्रमांक    वेब मेल :- ar.dharangaon@coop.maharashtra.gov

************************************************************

६९६ जा.क्र.आस्थापना/कलम ७७ अ/लाडली/प्र.नि./सन.२०१७    दिनांक. १५/०६/२०१७

वाचले :-१) सचिव. लाडली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. लाडली ता.धरणगांव यांचा दि.१४/६/२०१७ चा अहवाल

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ

---

ज्या अर्थी, लाडली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.लाडली ता.धरणगांव जि.जळगांव हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोदणीकृत सहकारी संस्था असून सदर संस्था या कार्यालयाच्या नियंत्रण कक्षेत्त येते आणि,

ज्या अर्थी लाडली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. लाडली ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेचे एकुण १३ संचालका पैकी १० संचालक निवडून आलेले होते. दोन जागा रिक्त आहेत. १० संचालकापैकी १) १) श्री.शिवाजी केशव पाटील संचालक २) श्री.मुलचंद शंकर पाटील संचालक ३) श्री.ज्ञानेश्वर चुडामण पाटील संचालक ४) श्री.मधुकर तुंबडू पाटील संचालक ५.श्री.संजय पाडूरंग पाटील संचालक ६.श्री.गोपाळ खंडू सोनावणे या ६ संचालकांनी दिनांक.०६/६/२०१७ रोजी संस्थेकडे राजिनामे दिले होते.संचालक मंडळ सभा दि.१४/६/२०१७ रोजी ठराव क्र.२ अन्वये त्यांचे राजिनामे मंजुर करण्यात आले असून तसा अहवाल सचिव यांनी वाचले क्र.१ नुसार या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्या अर्थी संस्थेच्या १० संचालकापैकी वर नमुद ०६ संचालकांनी राजिनामे दिलेले असल्याने व संचालक मंडळ सभा दि.१४/६/२०१७ ठराव क्र.२ अन्वये मंजुर केलेले असून संचालक मंडळ अल्पमतात आलेले आहे.

त्या अर्थी संस्थेचे कामकाज उपविधी मधील तरतदीनुसार सुरळीत रहाणेच्या दृष्टीने प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे वरील परिस्थितीच्या अनुषंगाने क्रमप्राप्त झाल्याने मी खालील आदेश देत आहे

-:आ दे श :-

मी गुलाब पाटील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगांव जि.जळगांव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन वरील नमुद केलेल्या वस्तुथितीच्या आधारावर,परीस्थीतीमुळे व कारणास्तव लाडली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.लाडली ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेची व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत आहे. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालविण्यासाठी श्री.अरुण विश्वनाथ पाटील क्षेत्रीय अधिकारी जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव (भाग नं.५ पाळधी भाग) यांची संस्थेचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्रशासक यांनी पदभार घेतल्यापासुन सहा महिन्याचे कालावधीत नविन समितीची रचना करणे बाबत कायदेशीर कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दि. १५/६/२०१७ रोजी माझे स्वाक्षरीने व कार्यालयीन मोहर ठसवुन निर्गमित केला असे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, धरणगांव ता.धरणगांव, जि.जळगांव

स्थळ:- धरणगांव

दिनांक:-१५/६/२०१७

( गुलाब पाटील )

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था,धरणगांव

प्रति,

१) चेअरमन/सचिव, लाडली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. लाडली ता.धरणगांव जि.जळगांव

२) श्री.अरुण विश्वनाथ पाटील क्षेत्रीय अधिकारी जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव (भाग नं.५ पाळधी भाग)

२/- सदर संस्थेच्या प्रशासक पदाचा पदभार घेवुन तसा अहवाल सर्व संबंधीतांना तात्काळ सादर करावा.

प्रत:- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) शाखा व्यवस्थापक जिल्हा मध्येवर्ती सहकारी बँक लि. शाखा. चांदसर ता.धरणगांव

२) मा. व्यवस्थापक येरवडा कारागृह मुद्रणालय पुणे ६

२/- आपणास विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची प्रत शासनाच्या येत्या राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या चार प्रति या कार्यालयास पाठवाव्यात.

३) लेखा परिक्षक सहकारी संस्था एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव

४) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव माहितीसाठी सविनय सादर

५) म.कार्यकारी संचालक,दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था,धरणगांव